महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022
Website : www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा .क्र. वनार्टी /नागपूर/स्पर्धा परिक्षा/१२१०/२०२६-२७ दिनांक :-०६/११/२०२६

परिपत्रक

विषय : वनार्टीमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (नागरी सेवा) मुख्य परीक्षा २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखत चाचणी परीक्षेकरिता आर्थिक सहाय्य प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (UPSC) आयोजित नागरी सेवा परीक्षेत यश संपादन करण्यासाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्या पुढील तयारीस आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, या उद्देशाने वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत एकरकमी आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येत आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (नागरी सेवा) मुख्य परीक्षा २०२६ चा दिनांक ०५/११/२०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार उत्तीर्ण होऊन मुलाखत चाचणीसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांकडून सदर आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रतेचे निकष :

१. अर्जदार विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
२. अर्जदार विद्यार्थी विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील असून, नॉन-क्रिमिलेअर गटातील असणे आवश्यक आहे.
३. अर्जदाराने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (नागरी सेवा) मुख्य परीक्षा २०२६ मध्ये दिनांक ०५/११/२०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्रता प्राप्त केलेली असावी.
४. सदर परीक्षेसाठी महाज्योती संस्थेमार्फत आर्थिक सहाय्याचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

अर्ज करण्यासाठी सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे :

१. आधार कार्ड (आधार कार्डच्या पुढील व मागील बाजूची प्रत).
२. जात प्रमाणपत्र (Caste Certificate).
३. वैध व डिजिटलरीत्या पडताळणी केलेले नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate).
४. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (नागरी सेवा) मुख्य परीक्षा २०२६ चे प्रवेशपत्र.
५. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (नागरी सेवा) मुख्य परीक्षा २०२६ च्या निकालाची प्रत, ज्यामध्ये संबंधित विद्यार्थ्याचा बैठक क्रमांक (Roll Number) ठळकपणे दर्शविलेला असावा.

अर्ज कसा करावा :

१. पात्र विद्यार्थ्यांनी वनार्टीच्या अधिकृत www.vanarti.in संकेतस्थळावरील Notice Board या विभागामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या **"Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For UPSC Interview 2026 (Civil Services)"** या जाहिरातीवर क्लिक करून ऑनलाइन अर्ज सादर करावा.

२. अर्जामध्ये विचारलेली सर्व माहिती अचूकपणे भरून, आवश्यक कागदपत्रे स्वाक्षांकित स्वरूपात स्पष्ट व वाचनीय पद्धतीने अपलोड करावीत.

३. अर्ज सादर करण्यापूर्वी अर्जदाराने भरलेली माहिती व अपलोड केलेली कागदपत्रे योग्य असल्याची खात्री करावी.

अटी व शर्ती :

१. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची **अंतिम दिनांक २०/११/२०२६** आहे.

२. अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारण्यात येतील. पोस्टाद्वारे अथवा ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, प्राप्त अर्ज स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात आवश्यक ते निर्णय घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांच्याकडे राखीव राहतील.

४. अर्जदाराने सादर केलेली माहिती अथवा कागदपत्रे छाननीच्या कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण, बनावट अथवा दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अर्जदाराचा अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच, संबंधित विद्यार्थ्याविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. वनार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध आर्थिक सहाय्य योजनांपैकी चालू आर्थिक वर्षात विद्यार्थ्यास कोणत्याही एका आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेता येईल. एकाच आर्थिक वर्षात एकापेक्षा अधिक योजनांचा लाभ घेता येणार नाही.

६. आर्थिक सहाय्याची रक्कम वितरित करण्यासाठी अर्जदार विद्यार्थ्याचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न (Aadhaar Seeded) असणे आवश्यक आहे.

७. ऑनलाइन अर्ज सादर करताना तांत्रिक अथवा अन्य कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवल्यास अर्जदारांनी केवळ वनार्टीच्या खालील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक : +९१ ७८८ ७८८ २०२६

-स्वा-
(प्रशांत वावगे)
व्यवस्थापकीय संचालक
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर